नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/11/2023 (रविवार) सकाळ

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलीस स्टेशन केळवदची कारवाई

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर वसुले ढाबा समोर केळवद शिवार येथे दिनांक ०३/११/२०२३ चे १२.४० वा. दरम्यान केळवद पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन आरोपीची कंटेनर गाड़ी क्र. आर. जे– ११/ जी. बी. ६९२४ येतांना दिसली. गाडीला थांबण्याचा इशारा केला असता गाडी चेक केली असता गाडी मध्ये चालक **आरोपी नामे– मुनाशिब वल्द नवाब खान, वय २२ वर्ष रा. शिंगार तेह. पुनाना जिल्हा मेवात (हरियाणा) २) सौकत वल्द हारुण खान, वय २४ वर्ष, रा. सिरोली ते पुनाना जिल्हा मेवात (हरियाणा), ३) शोयब वल्द आसू खान, वय २४ वर्षे रा. कोट तह. हत्तीन जिल्हा परवल (हरियाणा) ४) बरकत वल्द कमरुद्दीन खान, वय ३६ वर्षे रा. कोट तह. हातीन जिल्हा परवल (हरियाणा), ५) अब्दुल सलाम वय ५३ वर्षे, रा. कडनकोड तह. चेरुवातुर, जिल्हा कासारकोड (केरळ)** हे आपल्या वाहनात महाराष्ट्रात जनावर हत्याबंदी कायदा असल्याचे माहीत असतांना सुध्दा म्हशी गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन अवैधरीत्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून यातील एकुण ४९ नग जिवंत म्हशी गौवंश जनावरे किंमती ४,९०,०००/– रुपये २) कंटेनर गाड़ी क्र. आर. जे ११/जी.बी.– ६९२४ किंमती १०,००,०००/– रुपये असा एकुण किंमती १४,९०,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोशी धोंडुतात्या बाजीराव देवकाते, रा. पो. स्टे केळवद यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम २७९, ३४ भा.द.वि. सहकलम ३, ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधिनियम १९६० सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनीयम १९९५ सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार किशोर ठाकरे पोस्टे केळवद मो. नं. ८००७४९२६५६ हे करीत आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर